E-Paper : www.vidharbhsatyajeet.in
सत्याचा शोध...बातमीची धार!
RNI-MAHMAR-2023/88726
दैनिक विदर्भ सत्यजीत
LIVE NEWS
विदर्भातील प्रत्येक बातमी... सर्वात आधी, सर्वात खरी!
प्रमुख मार्गदर्शक शौकत भाई शेख
मुख्य संपादक उध्दव श्रीराम फंगाळ मो.9511446111 / 9921746611
कार्यकारी संपादक योगेश सौभागे
अचूक बातमी | निर्भीड पत्रकारिता | वेगवान अपडेट | जनतेचा विश्वास | सत्याच्या पथावर आम्ही सदैव
बुलढाणा . वर्ष ४ थे, अंक ५८ वा, वार शनिवार ३ऑक्टोबर२०२६ पाने ४ किंमत ४ रुपये

# मेहकरात अवतरले साक्षात संत श्री गजानन महाराज

## शेगावीचा राणा' भक्तिगीताच्या आरती सोहळ्याचे भावपूर्ण चित्रीकरण

### महाराष्ट्रभरातून १५० हून अधिक कलाकारांची उपस्थिती




मेहकर : संत श्री गजानन महाराजांच्या पावन चरणी भक्तिभावाने नतमस्तक करणाऱ्या 'शेगावीचा राणा' या आगामी भक्तिगीताच्या चित्रीकरणातील भव्य आरती सोहळा नुकताच बालाजी लॉन्स, मेहकर येथे भक्तिमय वातावरणात पार पडला.विठू माऊली फिल्म्स क्रियशन, मेहकरच्या वतीने साकारण्यात येत असलेल्या या भक्तिगीताच्या आरतीच्या प्रसंगामध्ये आनंद ज्वेलर्सचे श्री. आनंदभाऊ काटकर यांनी संत श्री गजानन महाराजांची भूमिका साकारली. महाराजांच्या भूमिकेतील त्यांचा वेश, देहबोली, भावमुद्रा आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व पाहून उपस्थितांना जणू साक्षात श्री गजानन महाराजांचेच दर्शन होत असल्याची अनुभूती आली.आरतीच्या वेळी परिसरात गण गण गणात बोते चा जयघोष घुमत होता. भक्तिमय वातावरण आणि श्रींच्या चरणी लीन झालेले शेकडो कलाकार यामुळे बालाजी लॉन्स परिसराला जणू शेगावच्या पावन नगरीचे स्वरूप प्राप्त झाले होते. उपस्थितांच्या डोळ्यांत भक्तिभाव आणि मनात श्रींच्या नामस्मरणाची अनुभूती दिसून येत होती.या भव्य चित्रीकरणासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून १५० हून अधिक कलाकारांची उपस्थिती लाभली. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत विविध वयोगटातील कलाकारांनी अत्यंत श्रद्धेने या आरती सोहळयात सहभाग घेतला.या सोहळ्याची आकर्षक व भव्य सजावट विजय डेकोरेशन मॅनेजमेंट यांच्या वतीने करण्यात आली. सुंदर सजावट, प्रकाशयोजना आणि भक्तिमय वातावरणामुळे



आरतीचा प्रसंग अधिकच प्रभावी ठरला.'शेगावीचा राणा' या भक्तिगीताचे लेखन सुप्रसिद्ध गीतकार डॉ. श्रीकृष्ण राऊत यांनी केले असून, संगीत प्रा. डॉ. हर्षवर्धन मानकर यांचे आहे. या भक्तिगीताचे छायाचित्रीकरण रागिणी स्टुडिओचे प्रमोद ताजने, रामदास भगत आणि अमर धांगड यांनी केले आहे. गीताचे दिग्दर्शन विजय आसाराम फंगाळ यांनी केले आहे.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन तसेच विशेष सहकार्य सिद्धार्थ जाधव यांचे लाभले. त्याचप्रमाणे बालाजी



लॉन्सचे चेतन भाऊ काटे आणि इव्हेंट मॅनेजमेंटचे विजय भाऊ भादुपोथा यांचे विशेष सहकार्य या संपूर्ण चित्रीकरणासाठी लाभले.संत श्री गजानन महाराजांच्या भक्तीचा आणि त्यांच्या कृपाछायेचा भाव मनामनात पोहोचविण्याचा प्रयत्न 'शेगावीचा राणा' या भक्तिगीतातून करण्यात येत आहे. श्रींच्या चरणी अर्पण केलेल्या या भक्तिमय कलाकृतीच्या माध्यमातून 'गण गण गणात बोते'चा जयघोष महाराष्ट्रातील प्रत्येक भक्ताच्या मनापर्यंत पोहोचावा, अशी भावना निर्मिती टीमने व्यक्त केली.श्रींच्या नामस्मरणाने भारावलेल्या या आरती सोहळयाने मेहकरच्या सांस्कृतिक आणि भक्तिमय वातावरणात एक अविस्मरणीय अध्याय जोडला आहे.लवकरच ह्या गीताची फायनल शुटिंग होऊ लवकरच होऊन प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे

# शेणवा बीटमध्ये राष्ट्रीय पोषण माह २०२६ व सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन.




शहापूर एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प शहापूर अंतर्गत शेणवा येथे अंगणवाडी सेविका व आशा सेविकांचे प्रशिक्षण आणि अभिनव पोषणाची सापशिडी कार्यक्रमाचे आयोजन!!!शेणवा:(हुसेन भाई शेख) एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प शहापूर अंतर्गत शेणवा बीटमध्ये राष्ट्रीय पोषण माह २०२६ व सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध आरोग्य व पोषणविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, त्याचाच एक भाग म्हणून दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी अंगणवाडी सेविका व आशा सेविकांसाठी आरोग्य व पोषणविषयक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र व पिंक स्माईल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या शिबिरात रक्तक्षय प्रतिबंध, हिमोग्लोबिन तपासणी, माता-बाल आरोग्य, किशोरवयीन आरोग्य तसेच एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित अंगणवाडी सेविका व आशा सेविकांची हिमोग्लोबिन तपासणीही करण्यात आली. या शिबिरास प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कांबळे सर, मुख्यसेविका वनिता दुगाडे मॅडम, पिंक स्माईल फाउंडेशनच्या समन्वयक पुनम पवार




मॅडम व त्यांचे सहकारी तसेच प्रशिक्षक रुपाली शिंदे मॅडम उपस्थित होत्या,त्यांच्या मार्गदर्शनातून आरोग्य व पोषणविषयक महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. दरम्यान, दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प शहापूर अंतर्गत अंगणवाडी केंद्र कळमपाडा येथे पोषण महा अभियानांतर्गत पोषण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. माता व बालकांना पोषणाचे महत्त्व समजावे तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध पौष्टिक अन्नपदार्थांचा आहारात योग्य वापर व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम घेण्यात आले. या मेळाव्यात पोषण हंडी, पोषण थाळी, आहार मनोरा, रानभाजी प्रदर्शन, आहार प्रात्यक्षिक तसेच टी. एच. आर. चे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. स्थानिक व पारंपरिक अन्नपदार्थांचा आहारात समावेश करून महिला व बालकांचे आरोग्य व पोषण सुधारण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. 'पोषण सापशिडी' या खेळाच्या माध्यमातून संतुलित व विविध आहार, पौष्टिक अन्न, स्वच्छता, सुरक्षित पाणी, नियमित खेळ, पुरेशी झोप, बालकांशी संवाद व बालविकास याबाबत महिला व बालकांना मनोरंजक पद्धतीने माहिती देण्यात आली. माता व बालकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. पोषण माह अभियानाच्या माध्यमातून 'पौष्टिक आहार, निरोगी बालक आणि सुदृढ कुटुंब' हा संदेश देत मातांमध्ये पोषणाबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांना महिला, बालके व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचा समारोप पोषण आरतीने करण्यात आला.

## शीर्षक :- कौटुंबिक हिंसाचार

स्वप्नांची पालवी घेऊन
लेक म्हणून आली सासरी
प्रेम मिळेल या आशेने
सोडून आली माहेरची ओसरी...

स्वप्नांना तिच्या देऊ नका
अश्रूंची काळी धार
मुलगी माणूस आहे
नका करू अत्याचार...

हुंडा टोमणे मारहाण
कशासाठी हा व्यवहार
प्रेमाने जपा तिचे जीवन
नका करू अत्याचार...

शब्दांने जखम होते
हातांनी वाढतो घाव
हिंसेच्या सावलीत
हरवतो जगण्याचा भाव...

राग येता थांबा जरा
प्रेमाचा करूया विचार
हिंसेला कायम दूर ठेवू
माणुसकीला देऊ आधार...

हिंसा नको द्वेष नको
अपमानाचा नको वार
प्रेम समानता सन्मान
घरभर असूदे हा झंकार...

एकजुटीने आवाज देऊन
सुनेचा करू सन्मान संस्कार
कौटुंबिक हिंसाचार थांबवूया
स्त्रीवर नका करू अत्याचार...

© संध्या रायठक/ धुतडे
नांदेड



## अहिंसेचे पुजारी

अहिंसेचे पुजारी
अहिंसात्मक प्रणेता महात्मा गांधीनी
स्वदेशी कपड्यांची केली निर्मिती
स्वदेशी चरख्यावर सूत कातूनी
प्रगती वाटचालीने केली प्रगती..

सत्यमार्गाचा अवलंब करत गांधीजी
आयुष्यभर कायम झुंजत राहिले
जीवाची पर्वा न करता सूत प्रेमी सत्यमेव जयते 'संदेशाने जगाला प्रेरित केले ...

भारतीयांनी आपल्याच स्वदेशी
मालाचा करावा सदैव वापर स्विकार
गांधीजींच्या संदेशाचे पालन करून
चिनी मालावर कटाक्षाने करूया बहिष्कार...

स्वदेशी उत्पादने वापरून रोजगाराची
सुवर्णसंधी देवू आपल्याच कामगारांना
आर्थिक विकास घडवूनी रोखू चलन
सुबत्ता नांदवू,आत्मनिर्भर करूया होतकरूंना ..

सौ. स्नेहा मुकुंद शिंपी
नाशिक



# श्री गजान देशमुख यांना प्रदान होणार आदर्श शिक्षक पुरस्कार




सिंदखेड राजा विषेष बातमीदुसरबीड येथील जिवन विकास विद्यालया मधील शिक्षक श्री गजानन ओंकार राव देशमुख सर यांना राष्ट्रिय मानवाधिकार आणि भ्रष्टाचार विरोधी सामाजीक न्याय फाउंडेशन गव्हरमेंट ऑफ इंडियातर्फे दिनांक ४ अक्टोबर रविवार रोजी आदर्श शिक्षक समाज भुषण कृषीरत्न यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे त्या जिवन विकास विद्यालयाचे शिक्षक श्री गजानन ओंकारराव देशमुख यांचे योगदानाची दखल घेण्यात येशन त्यांची आदर्श शिक्षक म्हणुन निवड करण्यात आली असुन त्यांना जिल्हा अधिकारी कार्यालय नियोजन हॉल जळगाव येथे हा पुरस्कार ४ अक्टोबर रोजी प्रदान करण्यात येणार आहे त्या बददल जिवन विकास विद्यालयाचे कर्तव्य दक्ष प्राचार्य श्री गणेश भांगे सर यांचे कडुन श्री गजानन देशमुख यांचे . अभिनंदन करण्यात आले आहे



# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

## खासदार कल्याण काळे यांचा सोयगाव तालुक्यात दुष्काळ परिस्थितीची पाहणी




..सोयगाव सोयगाव: सोयगाव तालुक्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत सापडला असून, खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी काँग्रेस पक्षाने केली. काँग्रेस कमिटीच्या वतीने नायब तहसीलदार पुरवठा विभाग काकासाहेब साळवे सोयगाव यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.खासदार कल्याण काळे व जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांची सोयगाव येथील दुष्काळ परिस्थितीची पाहणी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक कर्जमाफी, पीक विम्याची तातडीने रक्कम, अखंडित वीजपुरवठा, पशुधनासाठी चारा छावण्या, विद्यार्थ्यांची फी माफी, शेतमजुरांना आर्थिक मदत तसेच रेशन व आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.खासदार डॉ. कल्याणराव काळे व जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.



# राजकुवर विद्यालयाचा अंशू संसरे बॉक्सिंगमध्ये चमकला; जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई




सोयगाव: फर्दापूर येथील राजकुवर विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी अंशू उमेश संसरे याने जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. अंशूच्या या उल्लेखनीय यशामुळे राजकुवर विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, त्याची आगामी विभागीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.अंशूने आपल्या जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर बॉक्सिंगच्या रिंगणात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदकाला गवसणी घातली. जिल्हास्तरावर मिळविलेल्या या यशानंतर त्याची परभणी येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.विद्यालयाच्या वतीने अंशूचा सत्कारअंशूच्या या यशाबद्दल राजकुवर विद्यालयाच्या वतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. जे. बेडवाल सर यांच्या हस्ते अंशूचा यशोचित सत्कार करून त्याचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी माध्यमिक विभागाचे शिक्षक एम. पी. सपकाळे, पूनम पोळ, गव्हाणे, मानकर, लोखंडे, राठोड सर यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.क्रीडा शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शनअंशूच्या या नेत्रदीपक यशामागे राजकुवर विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तडवी सर व विकास



चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. नियमित सराव, योग्य प्रशिक्षण आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे अंशूने जिल्हास्तरावर आपल्या खेळाची प्रभावी चुणूक दाखवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.आता विभागीय स्तरावरील स्पर्धेतही अंशूने अशीच दमदार कामगिरी करून पदकाची परंपरा कायम ठेवावी आणि राजकुवर विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, अशा विद्यालयातील शिक्षक व मान्यवरांनी मनपूर्वक खूप शुभेच्छा दिल्या आहे.

# सोहम फाउंडेशनकडून प्रभाग क्र. १४ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; सामाजिक कार्यात अग्रेसर




शहापूर गणेशोत्सवाचे औचित्य साधून सोहम फाउंडेशनच्या वतीने प्रभाग क्रमांक १४ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. शिक्षण क्षेत्रात प्रगती करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. हा कार्यक्रम सोहम फाउंडेशनच्या अध्यक्षा ✻सौ. वैदेही विवेक नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रमुख उपस्थिती म्हणून ✻श्री. विवेक नार्वेकर तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. प्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार विवेक नार्वेकर आणि फाउंडेशनचे पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घरत सर यांनी केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन ✻श्री बालाजी मित्र मंडळ, शहापूर यांनी केले होते.यावेळी बोलताना फाउंडेशनच्या अध्यक्षा ✻वैदेही नार्वेकर म्हणाल्या, ''सोहम फाउंडेशन नेहमीच सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात अग्रेसर राहिले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देणे हाच आमचा उद्देश आहे.''कार्यक्रमास प्रभागातील नागरिक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिवाजी लिये



# मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची शहापूर तालुक्यातील 'स्वप्नातील गाव' उपक्रमांतर्गत गावांना भेट




शहापूर गाव विकास समित्यांच्या कामाची पाहणी; स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, साक्षर, समृद्ध व सृष्टी या सहा घटकांवर सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शनठाणे, दि. ३० सप्टेंबर २०२६ (जिल्हा परिषद, ठाणे) : सेवा संकल्प अभियान अंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी शहापूर तालुक्यातील भोसपाडा, देवगाव व कोठारे या गावांना भेट देऊन स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून 'स्वप्नातील गाव' संकल्पनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या गाव विकास समित्यांच्या कामाची पाहणी केली. यावेळी गाव विकास समित्यांचे पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावरील अधिकारी यांच्याशी संवाद साधून गावाच्या विकासाचा आढावा घेण्यात आला.या दौऱ्यादरम्यान एकलव्य गाव विकास समिती, भोसपाडा ग्रामपंचायत टेंभा; गावदेवी गाव विकास समिती, देवगाव ग्रामपंचायत साकडबाव; तसेच सावित्रीबाई फुले गाव विकास समिती, कोठारे ग्रामपंचायत कोठारे यांच्या पदाधिकारी व सदस्यांशी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी संवाद साधला.यावेळी गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर बाबुराव राठोड, स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार व प्रसाद पाटील, महाव्यवस्थापक अविनाश कमाने, ठाणे-पालघर जिल्हा व्यवस्थापक रविंद्र राऊत, ग्रामपंचायत अधिकारी पावसे व ठाकरे, संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, गाव विकास समितीचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.वृक्षारोपणाने दौऱ्याची सुरुवातदौऱ्याची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत वृक्षलागवड करण्यात आली. त्यानंतर त्यांनी गावातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली.भोसपाडा येथे जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अनुभव,





शाळेतील सुविधा तसेच शिक्षणाशी संबंधित बाबी जाणून घेतल्या. तसेच गावातील घरकुलाची पाहणी करून लाभार्थ्यांशी संवाद साधला. लाभार्थ्यांच्या घरी जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' लावण्यात आला.'स्वप्नातील गाव' संकल्पनेच्या प्रवासाची माहितीस्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून गावपातळीवर 'स्वप्नातील गाव' ही संकल्पना कशा पद्धतीने रुजविण्यात आली, आतापर्यंत या संकल्पनेचा प्रवास कसा झाला, गाव विकास समित्यांची भूमिका काय आहे तसेच गावाच्या विकासासाठी काम करताना कोणत्या अडचणी येतात, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या पदाधिकारी व सदस्यांकडून माहिती घेतली.'स्वप्नातील गाव' संकल्पनेअंतर्गत गावाच्या विकासासाठी स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, साक्षर, समृद्ध आणि सृष्टी या सहा घटकांवर भर देण्यात येत आहे. या सहा घटकांच्या अनुषंगाने ग्रामस्थ व गाव विकास समितीने गावात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी जाणून घेण्यात आली.गावाचा विकास आराखडा तयार करताना ग्रामस्थांचा सहभाग कसा घेतला जातो, गावाचा नकाशा कशा पद्धतीने तयार करण्यात आला आहे आणि त्या नकाशामध्ये गावातील कोणकोणत्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे, याचीही माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतली.गावातील मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणीमुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी गावातील शासकीय यंत्रणांशी संबंधित प्रलंबित कामे तसेच मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये शोषखड्डे, समाजमंदिर, रस्ते, दफनभूमी, सोलर पथदिवे, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा आणि घरकुले यांचा समावेश होता.देवगाव येथे गावदेवी विकास समितीच्या पदाधिकारी व ग्रामस्थांकडून स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून गावात झालेल्या परिवर्तनाची माहिती घेण्यात आली. गाव स्वच्छ व सुंदर करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांची तसेच स्वच्छता व्यवस्थेची माहिती जाणून घेतली. ओला व सुका कचरा वेगळा करणे, गावातील स्वच्छता व्यवस्था आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेल्या शोषखड्ड्यांमुळे गावात झालेला बदल याबाबत ग्रामस्थांशी चर्चा करण्यात आली.उपजीविका निर्मिती आणि महिला बचत गटांच्या सक्षमीकरणावर भरगावाच्या सर्वांगीण विकासासोबतच ग्रामस्थांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उपजीविकेची साधने निर्माण करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. महिला बचत गटांच्या माध्यमातून गृहउद्योग तसेच शेतीच्या उत्पन्नावर आधारित विविध व्यवसाय उभारण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यामध्ये कुक्कुटपालन, शेळीपालन तसेच उत्पादित मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ व विक्री व्यवस्था निर्माण करणे याबाबतही चर्चा करण्यात आली. महिला बचत गटांना केवळ बचतीपुरते मर्यादित न ठेवता त्यांना उत्पन्ननिर्मितीच्या उपक्रमांशी जोडण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.शिक्षण, आरोग्य व उपजीविकेला प्राधान्यगावाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि उपजीविका हे महत्त्वाचे घटक असून, या क्षेत्रांत ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले. गावातील उपलब्ध शासकीय यंत्रणा, ग्रामपंचायत, गाव विकास समिती आणि सामाजिक संस्थांनी परस्पर समन्वयातून काम केल्यास विकासकामांना अधिक गती मिळू शकते, यावरही त्यांनी भर दिला.गाव विकास समिती, शासन आणि स्वदेस फाऊंडेशन यांनी एकत्रितपणे नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास गावाच्या सर्वांगीण विकासाचा एक आदर्श निर्माण होऊ शकतो, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.गाव विकास आराखड्यानुसार प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनागावातील विविध समस्या व प्रलंबित विकासकामांबाबत ग्रामस्थांशी चर्चा केल्यानंतर संबंधित कामांचे प्रस्ताव तयार करून ते ग्रामपंचायतीमार्फत संबंधित शासकीय यंत्रणेकडे सादर करून त्याचा पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.गावातील शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, उपजीविका, महिला सक्षमीकरण तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित बाबींवर ग्रामस्थांकडून माहिती घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी दिशा निश्चित करण्यात आली.या भेटीमुळे गावातील प्रलंबित समस्या थेट प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यास मदत झाली. तसेच गाव विकास समित्यांच्या माध्यमातून ग्रामस्थांचा सहभाग वाढवून 'स्वप्नातील गाव' संकल्पनेच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी पुढील दिशा निश्चित झाली.''पुढील दोन वर्षांत गाव स्वप्नातील गाव बनविण्याचा संकल्प''मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भेटीमुळे ग्रामस्थांमध्ये उत्साह निर्माण झाला असून, गाव विकास समिती आणि ग्रामस्थ अधिक जोमाने काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पुढील दोन वर्षांत आपले गाव 'स्वप्नातील गाव' बनविण्याचा ठाम विश्वास व संकल्प ग्रामस्थांनी व्यक्त केला.ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, गाव विकास समित्यांचे नियोजनबद्ध काम, ग्रामपंचायतीचा समन्वय आणि स्वदेस फाऊंडेशन तसेच शासकीय यंत्रणांचे सहकार्य यांच्या माध्यमातून गावांच्या विकासाला अधिक गती मिळण्यास या भेटीमुळे निश्चितच चालना मिळाली.

# लाडकी बहीण योजनेपासून वंचित महिलांसाठी महागावात काँग्रेसचा जनता दरबार

## महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; विविध समस्यांवर करण्यात आली चर्चा




महागाव यवतमाळ महागाव : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी बुधवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी तालुका काँग्रेस कमिटी कार्यालय, महागाव येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. या जनता दरबाराला तालुक्यातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या कार्यक्रमाला महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्ष वंदनाताई आवारी, नीलिमा काळे ताई, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष महिंद्रजी कावळे सर, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील भाऊ राठोड, युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष इम्रान पठाण, माजी नगराध्यक्ष सुनंदाताई कोपरकर, नगरसेविका सुरेखाताई कोपरकर तसेच नगरसेविका रूपालीताई कोलेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.लाडकी बहीण योजनेपासून वंचित राहिलेल्या महिलांच्या अडचणी, अर्जासंदर्भातील समस्या तसेच योजनेचा लाभ मिळविताना येणाऱ्या अडथळ्यांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. उपस्थित महिलांनी आपल्या विविध समस्या पदाधिकाऱ्यांसमोर मांडल्या.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. जयश्री संजय नरवाडे, तालुकाध्यक्ष महिला काँग्रेस कमिटी, महागाव, सौ. सीमा नरवाडे, शहराध्यक्ष महिला काँग्रेस कमिटी, महागाव, हसीना आगवान, दीक्षा धम्मानंद कावळे, सीमाताई जाधव, प्रसिक पाईकराव तसेच इतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाधान पाटील राऊत यांनी केले. तालुक्यातील मोठ्या संख्येने महिलांनी या जनता दरबारात सहभाग नोंदविल्याने कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



# एम. ई. एस. महाविद्यालय मेहकरच्या प्राचार्यपदी डॉ. संजय दांदडे यांची नियुक्ती




मेहकर : स्थानिक एम. ई. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर येथे कायमस्वरूपी प्राचार्य म्हणून डॉ. संजय मोतीराम दांदडे यांची नियुक्ती करण्यात आली. दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांनी प्राचार्यपदाचा कार्यभार स्वीकारला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षलभाऊ सोमण यांच्या हस्ते डॉ. दांदडे यांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आला. तसेच पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.यावेळी संस्थेचे सचिव मा. प्रमोदजी मुळे, सचिव मा. नीरजजी देशपांडे, कोषाध्यक्षा मा. वंदनाताई दीक्षित, संचालक मा. मोहन ठोसर तसेच एम. ई. एस. फार्मसी कॉलेज, मेहकरचे प्राचार्य मा. सुधीरजी मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. संजय दांदडे यांच्या नियुक्तीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि गुणवत्तावर्धक उपक्रमांना अधिक गतिमान दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात नवी उंची गाठावी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी आणि संस्थेच्या प्रगतीचा आलेख अधिक उंचावावा, अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या.



# कासारबेहळ येथे सोयाबीन पिकाची दयनीय अवस्था!

## साहेबराव कांबळे यांची शेतकऱ्यांच्या बांधावर धाव..

महागाव, प्रतिनिधीतालुक्यांतील कासारबेहळ येथे अत्यल्प पाऊस आणि पिवळा मोझॅक रोगामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतातील उभे पीके पिवळे पडून करपून गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे सामाजिक कार्यकर्ते साहेबराव कांबळे यांनी कासारबेहळ येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोयाबीन पिकाच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यात येऊन तातडीच्या उपाय योजनेसाठी प्रश्न मार्गी लावण्याचे सांगत शेतकऱ्यांना धीर दिला.कासारबेहळ परिसरात यंदा सोयाबीनची मोठ्या प्रमाणात पेरणी करण्यात आली होती. सुरुवातीला पीक चांगले आले होते,मात्र शेंगा भरण्याच्या आणि दाणे पोकण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने दाडी मारल्याने आणि सतत ढगाळ वातावरण राहिल्याने पिकावर पिवळारोग, खोडकुजव्या रोगाचा प्रादुर्भाव झाला. परिणामी संपूर्ण शेतातील सोयाबीनचे झाडे पिवळे पडून वाळून गेले आहे. शेंगांमध्ये दाणे भरलेच नाहीत. साहेबराव कांबळे यांनी शेतकऱ्यांना धीर देत शासनाकडून शासकीय मदत मिळवून देण्याची हमी दिली. या वेळी केशवराव बिचकुले यांच्या शेतातील सोयाबीन पिकाच्या नुकसानीची पाहणी करण्यात आली. शासनाकडून नुकसान भरपाईसाठी राजाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून नुस्कानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळावी यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे साहेबराव कांबळे यांनी आश्वासन दिले. पाहणी दौऱ्यादरम्यान पिंटू पिठलेवाड,शेषराव करे,संजय पावडे,राजू पाटे, धोंडबाराव करे, बालाजी बिचकुले नंदू मस्के यांचेसह अनेक शेतकरी यावेळी उपस्थित होते. (बॉक्स) शेतकऱ्यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की,''आम्ही एकरी १८ ते २० हजार रुपये खर्च करून बियाणे,खत, औषधी फवारणी केली. बँकेकडून कर्ज काढले. पण आता हातात काहीच येणार नाही. एकरी ८ क्विंटल अपेक्षा होती, तिथे १ क्विंटल सुद्धा होईल की नाही याची शाश्वती नाही.''(बॉक्स)पाहणीनंतर साहेबराव कांबळे म्हणाले की,''महागाव तालुक्यांतील परिस्थिती अतिशय गंभीर आहे. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शासनाने केवळ कागदोपत्री पंचनामे न करता तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा.'' कृषी विभाग आणि महसूल विभागाने संयुक्तपणे कासारबेळसह संपूर्ण महागांव तालुक्यांतील नुकसानीचे पंचनामे करावेत.पीक विमा कंपनीने शेतात येऊन पाहणी करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी. दुष्काळग्रस्त म्हणून महागांव तालुका जाहीर करून शेतकऱ्यांना



हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत थेट खात्यात जमा करावी.या पाहणीमुळे कासारबेहळ येथील शेतकऱ्यांना थोडा आधार मिळाला.शासनद्वारे या बाबीची निश्चितच दखल घेईल अशी शेतकऱ्यांतून अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मोबाईल मुळे लहान मुलांच्या आणि वडीलधाऱ्या माणसाच्या जीवनावर होणारे परिणाम एक छोटासा लेख

## मोबाईल वापरणे कितपत योग्य आहे जास्त मोबाईल वापरल्यास काय फायदे होणार आणि काय तोटे होणार

आजच्या युगात मोबाईलचे महत्त्व, फायदे आणि तोटे: एक विश्लेषणात्मक लेखआजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात मोबाईल फोन मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. एकेकाळी फक्त संभाषणाचे साधन असलेला मोबाईल आता माणसाचा सखा, सोबती आणि दैनंदिन गरजा पूर्ण करणारा डिजिटल सहाय्यक बनला आहे. तंत्रज्ञानाच्या या क्रांतीचे जेवढे फायदे आहेत, तितकेच त्याचे गंभीर परिणामही समाजात दिसून येत आहेत.१. लहान मुले आणि वडीलधाऱ्या माणसांवर मोबाईलचे होणारे परिणामलहान मुलांवर होणारे परिणाम:शारीरिक त्रास: मोबाईलच्या स्क्रीनकडे सतत पाहिल्यामुळे मुलांच्या डोळ्यांवर ताण येणे, चष्म्याचा नंबर वाढणे, डोकेदुखी आणि लठ्ठपणा यांसारख्या समस्या वाढल्या आहेत.मानसिक व बौद्धिक विकासात अडथळा: मैदानी खेळ कमी झाल्यामुळे मुलांची कल्पकता आणि शारीरिक विकास मंदावतो. चिडचिडपणा, एकाग्रतेचा अभाव आणि मोबाईल गेमिंगचे व्यसन या गंभीर समस्या निर्माण होत आहेत.सामाजिक दुरावा: मुले प्रत्यक्ष नातेवाईक किंवा मित्रांशी संवाद साधण्याऐवजी डिजिटल दुनियेत रमतात, ज्यामुळे त्यांच्यातील सामाजिक भान व भावनिक बुद्धिमत्ता कमी होते.वडीलधाऱ्या (ज्येष्ठ) माणसांवर होणारे परिणाम:एकाकीपणावर उपाय आणि दुष्परिणाम: मोबाईलमुळे लांब असलेल्या मुलांशी किंवा नातेवाईकांशी व्हिडिओ कॉलद्वारे बोलणे सोपे झाले आहे. परंतु, घरातील इतर सदस्य मोबाईलमध्ये व्यस्त राहिल्यामुळे ज्येष्ठांना उपेक्षित आणि एकटे वाटू शकते.आरोग्याच्या समस्या: वयोमानानुसार डोळ्यांना ताण पडणे, झोप न येणे (अनिद्रा) आणि मान किंवा पाठीचे विकार जडणे असे प्रकार घडतात.सायबर गुन्हेगारीचा धोका: तंत्रज्ञानाची पुरेशी माहिती नसल्यामुळे ज्येष्ठ नागरिक अनेकदा ऑनलाईन फसवणूक (सायबर फ्रॉड) किंवा चुकीच्या अफवांना सहज बळी पडतात.२. मोबाईलचे फायदे आणि तोटेजलद दळणवळण: जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून एका क्लिकवर संपर्क साधता येतो.व्यसन आणि वेळेचा अपव्यय: सोशल मीडिया आणि रिल्समुळे महत्त्वाचा वेळ वाया जातो.माहितीचा साठा: शिक्षण, व्यवसाय आणि सामान्य ज्ञानासाठी इंटरनेटवर अथांग माहिती उपलब्ध आहे.शारीरिक व मानसिक आजार: झोपेच्या समस्या, डोळ्यांचे आजार आणि तणाव वाढतो.ऑनलाईन सेवा: बँकिंग, शॉपिंग, बिल भरणे, तिकिट बुकिंग या गोष्टी घरी बसून होतात.सायबर गुन्हेगारी: डेटा चोरी, ऑनलाईन फसवणूक आणि प्रायव्हसीचा धोका असतो.करमणूक: गाणी, चित्रपट आणि खेळांच्या माध्यमातून सहज मनोरंजन होते.प्रत्यक्ष संवादाचा अभाव: कौटुंबिक आणि सामाजिक नातेसंबंधांमधील अंतर वाढते.३. मोबाईलमुळे माणसाच्या गरजा पूर्ण होऊ शकतात का?मोबाईलमुळे माणसाच्या अनेक प्राथमिक आणि द्वितीयक गरजा नक्कीच सहज पूर्ण होतात:आर्थिक व व्यावसायिक गरजा: ऑनलाईन बँकिंग, यूपीआय () पेमेंट आणि वर्क फ्रॉम होममुळे व्यवसाय व पैशांचे व्यवहार सोपे झाले आहेत.शैक्षणिक व ज्ञानविषयक गरजा: विद्यार्थ्यांना घरबसल्या ई-लर्निंग, ऑनलाईन क्लासेस आणि पुस्तके उपलब्ध होतात.दैनंदिन सोयी: अन्न, औषधे, कपडे आणि प्रवास यांसारख्या सेवा मोबाईल अ‍ॅप्सद्वारे एका क्लिकवर मिळतात.परंतु, मोबाईल माणसाच्या भावनिक आणि शारीरिक गरजा (उदा. प्रत्यक्ष प्रेम, आपुलकी, शारीरिक श्रम आणि नैसर्गिक आरोग्य) पूर्ण करू शकत नाही. मोबाईल हे गरजा पूर्ण करण्याचे 'साधन' आहे, 'पर्याय' नाही.४. आजच्या जीवनात मोबाईलची किती आवश्यकता आहे?आजच्या काळात मोबाईल ही केवळ 'सोय' राहिलेली नसून ती 'अत्यावश्यक गरज' बनली आहे.प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि उद्योग हे सर्व क्षेत्र डिजिटल प्रणालीवर आधारित आहेत.सरकारी योजनांचा लाभ घेणे असो किंवा आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळवणे असो, मोबाईल अनिवार्य झाला आहे.आजच्या वेगवान जगात वेळेची बचत करण्यासाठी आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मोबाईलची आवश्यकता नाकारता येत नाही.५. माणूस मोबाईलशिवाय राहू शकतो का? आणि मोबाईल नसेल तर तो काय करू शकतो?माणूस मोबाईलशिवाय राहू शकतो का?तांत्रिकदृष्ट्या माणूस मोबाईलशिवाय नक्कीच राहू शकतो, कारण मानवजातीने हजारो वर्षे मोबाईलशिवाय घालवली आहेत. परंतु, आजच्या रचनेत पूर्णपणे मोबाईलशिवाय राहणे अत्यंत कठीण आणि व्यावहारिकदृष्ट्या गैरसोयीचे आहे. तरीही, 'डिजिटल डिटॉक्स' (काही काळ मोबाईलपासून दूर राहणे) करून मानसिक शांतता मिळवणे शक्य आहे.जर मोबाईल नसेल, तर माणूस काय करू शकतो?प्रत्यक्ष संवाद आणि नातेसंबंध: लोक एकमेकांना प्रत्यक्ष भेटून बोलू शकतील, ज्यामुळे नात्यांमधील आपुलकी आणि जिव्हाळा वाढेल.मैदानी खेळ आणि व्यायाम: लहान मुले आणि तरुण मैदानावर जाऊन खेळतील, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारेल.वाचन आणि कलागुणांना वाव: पुस्तके वाचणे, संगीत शिकणे, चित्रकला किंवा इतर हस्तकलांमध्ये वेळ घालवणे शक्य होईल.निसर्गाच्या जवळ जाणे: स्क्रीनवर वेळ घालवण्याऐवजी निसर्गाच्या सानिध्यात फिरणे, निसर्ग निरीक्षण करणे या गोष्टी करता येतील.मानसिक शांतता: सतत येणारे नोटिफिकेशन्स आणि सोशल मीडियाच्या तणावापासून मुक्ती मिळून माणसाला एकांत व शांतता लाभेल.निष्कर्षमोबाईल हा एक 'उत्तम सेवक आहे, पण वाईट मालक आहे'. त्याचा योग्य आणि मर्यादित वापर केल्यास तो मानवी प्रगतीसाठी वरदान ठरतो. परंतु, जर आपण त्याचा अतीवापर केला तर तो आरोग्यासाठी आणि समाजासाठी शाप ठरू शकतो. त्यामुळे मोबाईलचा वापर संयमाने आणि आवश्यकतेनुसार करणे हेच आजच्या काळातील सुजाण नागरिकत्वाचे लक्षण आहे.शाळेतील मुलांवर, पती-पत्नीवर आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे परिणाम: एक सविस्तर विश्लेषणमोबाईल तंत्रज्ञानाने आपले जीवन अत्यंत सोपे केले असले, तरी त्याचा अतिवापर आता कौटुंबिक आणि वैयक्तिक आयुष्यात अनेक गंभीर समस्या निर्माण करत आहे. विशेषतः शाळेतील मुले आणि वैवाहिक नात्यांवर याचे अत्यंत विपरित परिणाम दिसून येत आहेत.१. शाळेतील मुलांवर मोबाईलमुळे होणारे परिणामशालेय वय हे मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाचा पाया असतो. या वयात मोबाईलचा वाढता वापर मुलांच्या भविष्यावर खालीलप्रमाणे परिणाम करत आहे:अभ्यासातील एकाग्रता कमी होणे: सततचे नोटिफिकेशन्स, सोशल मीडिया आणि गेम्समुळे मुलांचे अभ्यासातील लक्ष उडते. त्यामुळे स्मरणशक्ती मंदावते आणि शैक्षणिक कामगिरी खालावते.शारीरिक आरोग्याच्या समस्या: तासनतास एकाच जागी बसून मोबाईल पाहिल्याने लहान वयातच लठ्ठपणा, डोळ्यांचे विकार (चष्म्याचा नंबर वाढणे), डोकेदुखी आणि पाठीचे आजार सुरू होतात.चिडचिड आणि आक्रमकता: मोबाईल गेम्स (उदा. हिंसक गेम्स) किंवा शॉर्ट व्हिडिओंची सवय लागल्यामुळे मुलांमध्ये संयम कमी होतो. मोबाईल काढून घेतल्यास मुले प्रचंड चिडचिड करतात किंवा आक्रमक होतात.झोपेचे गणित बिघडणे: रात्री उशिरापर्यंत स्क्रीन पाहिल्यामुळे 'मेलाटोनिन' या झोपेच्या संप्रेरकाची निर्मिती कमी होते, ज्यामुळे मुलांना अपुरी झोप मिळते आणि सकाळी शाळेत थकवा जाणवतो.मैदानी खेळांचा अभाव: मुले मैदानावर जाऊन खेळण्याऐवजी डिजिटल गेमिंगमध्ये व्यस्त राहतात, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण शारीरिक विकास आणि संघभावना () विकसित होत नाही.सायबर धोके आणि चुकीचे संस्कार: इंटरनेटवर योग्य-अयोग्य समजण्याचे वय नसल्यामुळे मुले अनेकदा अश्लील सामग्री (), सायबर बुलिंग किंवा ऑनलाईन फसवणुकीच्या जाळ्यात अडकतात.२. पती-पत्नीच्या नात्यावर होणारे परिणाम ()मोबाईलमुळे आजघराघरांत पती-पत्नी एकाच खोलीत असूनही एकमेकांपासून मैलोन्मैल दूर गेल्याचे चित्र दिसते. याला समाजशास्त्रात 'फबिंग' ( - जोडीदाराकडे दुर्लक्ष करून मोबाईलमध्ये गुंतणे) म्हटले जाते.प्रत्यक्ष संवादाचा अभाव: दिवसभराच्या कामानंतर एकमेकांशी बोलण्याऐवजी दोन्ही जोडीदार स्वतःच्या मोबाईलमध्ये व्यस्त राहतात. यामुळे नात्यातील भावनिक जवळीक कमी होते.संशय आणि अविश्वास: सोशल मीडियावरील चॅटिंग, पासवर्ड लपवणे किंवा गुप्तता बाळगण्यामुळे पती-पत्नीमध्ये संशयाची भावना निर्माण होते, ज्याचे रूपांतर नंतर मोठ्या भांडणांमध्ये होते.कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष: मोबाईलमध्ये वेळ घालवल्यामुळे घरातील कामे, मुलांचे संगोपन आणि एकमेकांच्या गरजांकडे दुर्लक्ष होते, ज्यामुळे चिडचिड व ताणतणाव वाढतो.तुलना करण्याची वाईट सवय: सोशल मीडियावर इतरांचे 'परफेक्ट' आयुष्य, फिरणे आणि भेटवस्तू पाहून आपल्या जोडीदाराची इतरांशी तुलना करण्याची सवय जडते, ज्यामुळे नात्यात असंतोष निर्माण होतो.घटस्फोटाचे वाढते प्रमाण: क्षुल्लक वाटणाऱ्या मोबाईलच्या सवयींमुळे नात्यातील आधार, प्रेम आणि विश्वास संपतो; ज्यामुळे आजकाल पती-पत्नीमधील वादाचे आणि घटस्फोटाचे प्रमाण वेगाने वाढत आहे.३. मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे सर्वसाधारण व गंभीर परिणामज्याप्रमाणे कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट असतो, तसेच मोबाईलचा अतिवापर माणसाला शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या अपंग बनवत आहे.अ) शारीरिक परिणाम:टेक्स्ट नेक सिंड्रोम ( ): सतत मान खाली झुकवून मोबाईल वापरल्यामुळे मानेच्या आणि पाठीच्या मणक्यावर प्रचंड ताण येतो.डोळ्यांचे आजार: स्क्रीनमधून निघणाऱ्या निळ्या प्रकाशामुळे ( ) डोळे सुकणे ( ), दृष्टी मंदावणे आणि अंधुक दिसणे.अनिद्रा (): रात्री मोबाईल वापरल्याने शांत झोप येत नाही, ज्यामुळे सतत थकवा आणि चिडचिड राहते.ब) मानसिक व भावनिक परिणाम:नोमोफोबिया (): मोबाईल जवळ नसणे किंवा नेटवर्क नसणे याची प्रचंड भीती वाटणे आणि अस्वस्थ होणे.फँटम व्हायब्रेशन सिंड्रोम ( ): मोबाईल वाजला नसतानाही तो वाजल्याचा किंवा व्हायब्रेट झाल्याचा भास होणे.नैराश्य आणि एकाकीपणा: सोशल मीडियावर सतत राहूनही प्रत्यक्ष आयुष्यात माणूस एकाकी पडतो, ज्यामुळे डिप्रेशन () आणि अँक्झायटी () वाढते.क) सामाजिक व आर्थिक परिणाम:अपघातांचा धोका: गाडी चालवताना किंवा रस्ता ओलांडताना मोबाईल वापरल्यामुळे गंभीर अपघात होतात.वेळेचा अपव्यय: रिल्स () आणि सोशल मीडियावर तास न् तास वाया गेल्यामुळे वैयक्तिक प्रगती आणि कामाची उत्पादकता () घटते.उपाय आणि सकारात्मक पाऊलनो-फोन झोन (- ): जेवणाची टेबल आणि बेडरूममध्ये मोबाईल पूर्णपणे वर्ज्य करा.डिजिटल डिटॉक्स: आठवड्यातून किंवा महिन्यातून एक दिवस मोबाईलपासून पूर्णपणे दूर राहा.मुलांसाठी नियम: १४ वर्षांखालील मुलांना अभ्यासाव्यतिरिक्त मोबाईल देऊ नका आणि त्यांना मैदानी खेळांकडे वळवा.गुणवत्तापूर्ण वेळ ( ): पती-पत्नीने रोज किमान ३० मिनिटे मोबाईल बाजूला ठेवून एकमेकांशी मनापासून संवाद साधावा तसेच सध्याच्या युगात इयत्ता १ ली ते ४ थी च्या लहान विद्यार्थ्यांना मोबाईलवर अभ्यास पाठवणे कितपत योग्य आहे इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांना मोबाईलवर अभ्यास पाठवणे योग्य की अयोग्य?प्राथमिक स्तरावर (१ ली ते ४ थी) मोबाईलवर अभ्यास पाठवणे पूर्णपणे अयोग्य आणि घातक ठरते.वयाचा विचार करता अयोग्य: ६ ते १० वर्षे वयाची मुले अजून पूर्णपणे अनभिज्ञ असतात. मोबाईलवर पाठवलेला अभ्यास पाहण्यासाठी त्यांना पालकांवर अवलंबून राहावे लागते किंवा मुलांच्या हातात थेट मोबाईल द्यावा लागतो.मोबाईलचे व्यसन आणि स्क्रीन टाईम: अभ्यासाच्या नावाखाली मुलांच्या हातात लहान वयातच मोबाईल येतो. त्यामुळे अभ्यासापेक्षा गेमिंग, युट्यूब व्हिडिओ आणि रिल्सचे व्यसन लागण्याचा धोका प्रचंड वाढतो.शारीरिक दुष्परिणाम: लहान मुलांचे डोळे अत्यंत नाजूक असतात. स्क्रीनवर पाहून वहीत लिहिताना डोळ्यांवर ताण येणे, चष्म्याचा नंबर वाढणे, डोकेदुखी आणि चिडचिड वाढते.लेखन कौशल्याचा ह्रास: मोबाईलवरील पीडीएफ () किंवा फोटो पाहून लिहिताना मुलांचे लक्ष एकाग्र होत नाही. त्यामुळे सुंदर अक्षर, योग्य वळण आणि लिहिण्याचा वेग यावर विपरित परिणाम होतो.पालकांवर अतिरिक्त ताण: लहान मुलांचा अभ्यास मोबाईलवर आल्यास पालकांना कामावरून आल्यावर स्वतःचा वेळ देऊन तो पूर्ण करून घ्यावा लागतो. ज्या पालकांकडे स्मार्टफोन नाही किंवा इंटरनेट उपलब्ध नाही, त्या गरीब व ग्रामीण भागातील मुलांचे शैक्षणिक नुकसान होते.निष्कर्ष: १ ली ते ४ थी च्या मुलांसाठी डिजिटल अभ्यासाऐवजी प्रत्यक्ष कागद, वही आणि पुस्तकातील अभ्यासच सर्वात योग्य आहे.२. सर्वांसाठी लहान मुलांना फळ्यावर () गृहपाठ लिहून दिल्यास काय परिणाम होणार?शिक्षकांनी वर्गातील सर्व लहान मुलांना फळ्यावर गृहपाठ लिहून देणे आणि मुलांनी तो स्वतःच्या वहीत उतरवून घेणे, हा पारंपारिक मार्ग अत्यंत फायदेशीर आणि सकारात्मक आहे. याचे खालीलप्रमाणे चांगले परिणाम होतात:स्वावलंबन आणि जबाबदारी: मुले स्वतःच्या हाताने फळ्यावरील गृहपाठ वहीत लिहितात, ज्यामुळे त्यांच्यात ''आपला अभ्यास आपणच लिहिला पाहिजे'' ही जबाबदारीची आणि स्वावलंबनाची सवय लहान वयातच रुजते.दृष्टी आणि एकाग्रतेचा विकास (- ): फळ्याकडे पाहून वहीत लिहिताना मुलांची दृष्टी, हात आणि मन यांचा समन्वय साधला जातो. यामुळे मुलांची एकाग्रता वाढते.लेखन सुधारणा आणि गती: रोज फळ्यावरून गृहपाठ लिहिल्याने मुलांच्या हाताचे स्नायू बळकट होतात. अक्षरांचे वळण सुधारते आणि लिहिण्याचा वेग वाढतो.स्मरणशक्ती वाढते: स्वतःच्या हाताने लिहून घेतलेला गृहपाठ मुलांच्या चांगला लक्षात राहतो.समानता: वर्गातील श्रीमंत असो वा गरीब, प्रत्येक मुलाला समान गृहपाठ मिळतो. मोबाईल किंवा इंटरनेट नसल्यामुळे कोणीही अभ्यासापासून वंचित राहत नाही.३. शासनाने (शिक्षण विभागाने) याची दखल घेणे गरजेचे आहे का?होय, शासनाने आणि शिक्षण विभागाने या विषयाची अतिशय गंभीर दखल घेणे अत्यंत गरजेचे आहे.शासनाने काय करणे आवश्यक आहे?स्पष्ट नियमावली () काढणे: १ ली ते ४ थी (किंवा प्राथमिक स्तरावरील) विद्यार्थ्यांना मोबाईलवर व्हॉट्सअ‍ॅप किंवा इतर अ‍ॅपद्वारे गृहपाठ पाठवण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात यावी.फळ्यावरील गृहपाठाची सक्ती: शिक्षकांनी वर्गातच शेवटच्या १०-१५ मिनिटांत सर्व विद्यार्थ्यांकडून फळ्यावरील गृहपाठ त्यांच्या डायरीत किंवा वहीत लिहून घेण्याची सक्ती करावी.शिक्षकांना मार्गदर्शन व सूचना: शाळांना आणि शिक्षकांना स्पष्ट निर्देश दिले जावेत की, तंत्रज्ञानाचा वापर शिक्षकांच्या अध्यापनासाठी ठीक आहे, परंतु लहान मुलांच्या गृहपाठासाठी मोबाईलचा वापर पूर्णपणे टाळला पाहिजे.पालकांचे प्रबोधन: पालकांसाठीही जनजागृती उपक्रम राबवून लहान मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्याचे महत्त्व पटवून दिले पाहिजे.अंतिम निष्कर्षलहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी ''मोबाईलमुक्त प्राथमिक शिक्षण'' ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. लहान वयात मुलांच्या हाती मोबाईल देण्याऐवजी त्यांच्या हातात वही, पेन आणि पुस्तक देणेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हिताचे आहे. म्हणूनच शिक्षण विभागाने याबाबत तातडीने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.



# सेवा संकल्प अभियानात ठाणे जिल्ह्याची देदीप्यमान कामगिरी;

## तब्बल ३१,०२८ सेवांचा निपटारा करत प्रशासनाने साधला नागरिकांशी थेट संवाद..!




ठाणे /शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि प्रशासकीय सेवा थेट जनतेच्या दारापर्यंत पोहोचवून नागरिकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेले 'सेवा संकल्प अभियान' ठाणे जिल्ह्यात अत्यंत यशस्वी ठरले आहे. १७ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर या कालावधीत राबवलेल्या या विशेष अभियानामध्ये ठाणे जिल्हा प्रशासनाने तब्बल ३१,०२८ विविध महसुली व प्रशासकीय सेवांचा यशस्वी निपटारा करत संपूर्ण कोकण विभागात अतिशय उल्लेखनीय आणि कौतुकास्पद कामगिरी बजावली आहे. नागरिकांना शासकीय कार्यालयांचे वारंवार फेरे मारावे लागू नयेत, प्रशासकीय कारभारात अधिक गतिमानता आणि पारदर्शकता यावी तसेच समाजातील शेवटच्या घटकाला एकाच छताखाली विविध दाखले व शासकीय लाभ सहज उपलब्ध व्हावेत, यासाठी हे 'सेवा संकल्प अभियान' मैलाचा दगड ठरले असून यामुळे जनतेचा शासनावरील व प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. या आठवडाभराच्या अभियानात ठाणे जिल्ह्याने विविध नागरी व महसुली सेवांचे जलदगतीने वाटप केले. सेवा सेतू अभियान शिबिराचे आयोजन-५, वन हक्क दावे निकाली काढणे व वनपट्टे वाटप तसेच पात्र लाभार्थ्यांना वन हक्क दावे मंजूर करणे-१६, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते-५६, प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा करणे-१,११४, पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण-१४२, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देणे-१७२, दिव्यांग प्रमाणपत्र देणे-२, आधारकार्ड देणे-२७,८६८, जन्म मृत्यू नोंद घेणे व प्रमाणत्र देणे-३१, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र-५६०, महिला शेतकरी यांना प्रमाणपत्र वाटप करणे-४०, ७/१२ व ८ अ च्या नोंदी अद्ययावत करणे-१३४ असे एकूण ३१,०२८ सेवांचा निपटारा करण्यात आला आहे. ठाणे जिल्ह्याने गाठलेला हा ३१,०२८ चा भव्य टप्पा हा जिल्हा प्रशासनाच्या उत्कृष्ट नियोजन आणि अहोरात्र मेहनतीचा परिपाक आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, तहसीलदार सचिन चौधर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी), सर्व उपजिल्हाधिकारी आणि सर्व तहसीलदारांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे या अभियानाला अभूतपूर्व यश मिळाले आहे. गाव पातळीवरील तलाठी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून, लिपिक यांच्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत महसूल विभागातील प्रत्येक घटकाने दाखवलेली कर्तव्यनिष्ठा, तत्परता आणि संवेदनशील सेवाभाव यामुळेच हजारो नागरिकांना वेळेत हक्काच्या सेवा मिळू शकल्या आहेत. या सर्वसमावेशक व लोकाभिमुख कामगिरीबद्दल संपूर्ण ठाणे जिल्ह्यातून महसूल यंत्रणेचे व संपूर्ण प्रशासकीय टीमचे विशेष कौतुक होत आहे.



# शिरनेर जि.प. शाळेत महात्मा गांधी- लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी




अंबड प्रतिनिधी शिरनेर, दि. २ ऑक्टोबर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिरनेर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्त्या व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करून उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले. त्यानंतर मुख्याध्यापक सुरेश नंदबंशी यांनी विद्यार्थ्यांना दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्याची, विचारांची आणि देशासाठी केलेल्या योगदानाची सविस्तर माहिती दिली.अध्यक्षस्थानावरून सरपंच रामेश्वर गायके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांचे तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा व देशसेवेच्या आदर्शांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.यावेळी उपसरपंच विठ्ठल भोजने, ग्रामपंचायत सदस्य देविदास हातागळे, मंदिर कमिटी अध्यक्ष प्रभाकर वैद्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गंगाधर घुगरे, उपाध्यक्ष राम तांबे, सदस्य विनोद गायके, संदिपान गायके, भानुदास मंडलिक, हरिचंद्र इंदूरे, अशोक मंडलिक, मुख्याध्यापक सुरेश नंदबंशी, शिक्षक महादेव वैराळ, शालिनी वानखेडे, रंजना वारे, पल्लवी सदावर्ते, राजकुमार पिराणे, संतोष राऊत यांच्यासह अंगणवाडी कार्यकर्त्या मस्के, जाधव, इंदूरे व गायकवाड उपस्थित होत्या.सूत्रसंचालन महादेव वैराळ यांनी केले, तर आभार राजकुमार पिराणे यांनी मानले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.



# नवसंजीवनी सार्व.वाचनालयात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती तसेच सत्कार समारंभ




कुरखेडा :- दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा शासन मान्यता असलेल्या नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय देऊळगाव येथे, भारत देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून माल्यार्पण करण्यात आले व त्यांची जयंती साजरी करण्यात आली. वाचन संस्कृतीचे महत्व जाणून देऊळगाव येतील भास्कर खुणे न चुकता दररोज वाचनालयात येऊन वृतपत्र वाचत असतात. आणि आजच्या पिढीला वाचनाचे महत्व व फायदे पटवून देतात त्यांचे हे, अनमोल विचार, कार्य व वाचनाप्रती असलेली आवड बघून नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संतोष ठलाल यांनी पुष्पगुच्छ, शाल,श्रीफळ देऊन त्यांचा वाचनालयाच्या वतीने सत्कार केला. सोबतच साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी सुद्धा दोन्ही महापुरूषांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यावेळी उपस्थित असलेले देऊळगाव येतील प्रतिष्ठित नागरिक मंगेश गावळे, श्रावण ठलाल, पुर्णाबाई ठलाल, राजू ठलाल सत्कारमूर्ती भास्कर खुणे, विद्या,विकास हायस्कूल आणि जि.प.प्रा.शाळा देऊळगाव येतील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी दोन्ही महापुरुषांना अभिवादन केले.



# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

## महापुरुषांच्या जयंतीनिमित्त भाषण स्पर्धेचे आयोजन




अंबड प्रतिनिधी अंबड :येथील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कूल येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष डॉ. प्रवीणकुमार कासलीवाल यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शिक्षकांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला.तसेच विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली.स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे इ. १ ली ते ४ थी गट :प्रथम - सलगरकर श्री, द्वितीय - अभिमन्यू खरात, तृतीय - अद्धिक भद्रेइ. ५ वी ते ७ वी गट :प्रथम - मोटे श्रेया, द्वितीय - बोंडे शुभांगी, तृतीय - नासेर बिनमाजीइ. ८ वी ते १० वी गट :प्रथम - जोशी आदेश, द्वितीय - भोरे यशराज, तृतीय - डोखळे काव्यायशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष डॉ. प्रवीणकुमार कासलीवाल, संचालक मंडळ, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले.




# अहिल्यानगरमध्ये दि.६ रोजी रंगणार 'गोल्डन मेलेडी'चा सूरमयी नजराणा'

## माऊली सभागृहात' मंगळवार दि. ६ ऑक्टोबर रोजी भव्य संगीत मैफल !




श्रीरामपूर:अहिल्यानगर - संगीत प्रेमींसाठी एक खास पर्वणी घेऊन वैदेही बल्लाळ यांची हार्मनी म्युझिक्स घेऊन येत आहेत 'गोल्डन मेलेडी' लाईव्ह म्यूझिक आर्केस्ट्रा भाग पहिला, मंगळवार ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात ही भव्य संगीत मैफल पार पडणार आहे.या कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर येथील लोकप्रिय गायक कुशलकुमार जैन आणि अनिरुद्ध वरणगांवकर यांच्यासह अहिल्यानगरचे गुणी गायक देवदत्त पाऊलबुद्धे, सुमित वर्मा, निलेश महाजन, सारंग पंधाडे, महेश घावटे, मोहसीन सैफी, एस्तर पवार, विद्या तंन्वर आणि वैदेही बल्लाळ आपल्या बहारदार गायकीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.प्रसिद्ध संगीत संयोजक दीपक काळे यांच्या संगीताच्या तालावर दिलावर शेख, अमर वानखेडे, रितिक साटम, अमित बरुवा, हर्षद गणबोटे आणि सिद्धांत गायकवाड हे उत्कृष्ट वादक साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचे रसाळ आणि बहारदार निवेदन प्रसिद्ध निवेदक प्रदीप कुलकर्णी करणार असून, पुणे येथील 'गौतम साऊंड लाईट'ची उत्तम ध्वनी आणि प्रकाश योजना या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.अहिल्यानगर मधील संगीत प्रेमींनी या सुरेल कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रसिद्ध गायिका आणि निवेदिका वैदेही बल्लाळ आणि सहकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.प्रवेशासाठी पास आवश्यक असुन अधिक माहितीसाठी व पासेससाठी ८ ४ १ १ ८ ३ ९ ३ ८ ६ आणि९२२६६२३५९८ या क्रमांकांवर संपर्क साधावा असे आयोजकांतर्फे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.वृत्त विशेष सहयोग,ज्येष्ठ पत्रकार आबीद खान - अ.नगर. वृत्त प्रसिद्धी सहयोग,समता मीडिया सर्व्हिसेस श्रीरामपूर - ९५६११७४१११




# जिजामाता लोकसंचालित साधन केंद्र अंबड अंतर्गत हरत खेडा येथे माविम मित्र मंडळाची बैठक संपन्न




अंबड प्रतिनिधीअंबड: जिजामाता लोकसंचालित साधन केंद्र अंबड अंतर्गत हरतखेडा येथे माविम मित्र मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती अंबड ए. ए. चव्हाण, ग्रामसेवक घुगे, माविम मित्र मंडळ व्यवस्थापक नीता कोठोळे, आरजीबी वंदना फुके, सहयोगिनी शीतल येवले, सीआरपी योगिता टिकेकर तसेच बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.यावेळी मान्यवरांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत हाशिम मित्रमंडळास मार्गदर्शन केले.

